# पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर, यांचेकार्यालय,

मिलकॉर्नर,डॉ.बाबासाहेबआंबेडकररोड,औरंगाबाद-431001.
दुरध्वनी क्रमांक-0240-2326524,फॅक्सक्र.0240-2240596.
ईमेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in


---

**गोपनिय जा.क्र.विशा-५/आदेश/औबाद/२०१९- ४६ औरंगाबाद,दिनांक. १९/०३/२०१९**

## फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ अन्वये

**आदेश :-**

ज्या अर्थी मा.भारत निवडणुक आयोग नवी दिल्ली यांनी दि.१०/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व ४८ मतदार संघातून लोकसभेचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. तसेच दिनांक.१० मार्च २०१९ ते निवडणुकीची प्रक्रिया पुर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत भारत निवडणुक आयोगाने संपुर्ण महाराष्ट्राकरिता आदर्श आचारसंहिता लागू केली आहे.

आणि ज्याअर्थी मा.निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक ४३७/६/ईएस/०३/९४/एमसीएस/८१७५, दि. ०४/१०/१९९४ अन्वये निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत आचारसंहितेचा भंग होऊ नये तसेच शांततेत निवडणूक पार पाडण्याच्या दृष्टिकोनातुन राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने, किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचितकांनी मुद्रणालयाच्या सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, तसेच प्रकाशकांनी नमुना मतपत्रिका छापतांना खालील बाबींवर निर्बंध घालण्याची गरज असल्याची माझी खात्री झालेली आहे.

०१) उमेदवारचे नांव व त्यांना नेमून देण्यात आलेली चिन्ह छापणे.

०२) नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे.

०३) आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे.

त्याअर्थी **मी, डॉ.दिपाली धाटे-घाडगे,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,औरंगाबाद शहर** फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे वरील ठिकाणी वरील प्रमाणे कृती करण्यास दिनांक.२०/०३/२०१९ पासून ते आचार संहीता संपेपर्यंत निर्बंध घातील आहे.

सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती

बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज **दिनांक.१९ /०३/२०१९** रोजी औरंगाबाद येथे जारी करण्यात आला आहे.

**( डॉ.दिपाली धाटे-घाडगे )**
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,
औरंगाबाद शहर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, औरंगाबाद शहर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर
३)सर्व पो.स्टे./शाखा, प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२)जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
३)म.न.पा.आयुक्त,औरंगाबाद
४)उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, औरंगाबाद.
५)जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
६)केंद्र संचालक, आकाशवाणी, औरंगाबाद.
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा,औरंगाबाद